**रे.के.नं.१७९/२०२३**
**नि.क्र. २४/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.६** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | किशोर विश्वनाथ खंड, |
| वय | - | ४५ वर्षे |
| व्यवसाय | - | पोलीस हवालदार/२१३८, |
| राहणार | - | उरण पोलीस ठाणे |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पी. बी. देशमाने यांच्याद्वारे**

१. दिनांक २५.०६.२०२३ रोजी मी उरण पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो. सदर गुन्ह्याची नोंद पीएसआय श्री. कांबळे यांनी केली होती. दिनांक २७.०६.२०२३ रोजी सदर गुन्ह्याचा तपास माझेकडे सोपविण्यात आला. तपासकामी माझेकडे फिर्याद, प्रथम खबर व घटनास्थळ पंचनामा हे दस्तऐवज प्राप्त झाले होते. मी आरोपींना बोलावून कलम ४१-अ ची नोटीस दिली होती. त्यानंतर मी साक्षीदारांना बोलावून त्यांचे तपास टिपण नोंद करून घेतले. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी यांना पत्र देऊन जखमीचा अहवाल प्राप्त करून घेतला. आरोपीविरूद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने मी दोषारोपपत्र दाखल केले. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री. योगेश गांगण यांच्यामार्फत...**

२. माझेकडे तपास आल्यावर मी सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले होते. मी २७ तारखेला इतर कोणाचेही जबाब नोंदवले नाही. माझेकडे तपास आल्यावर मी

घटनास्थळावर जाऊन भेट दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ रहदारीच्या जागेवरील असल्याचे माझ्या लक्षात आले होते. मी २९ तारखेला घटनास्थळावर गेलो असेल. मी घटनास्थळावर गेलो त्या तारखेला दोन प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदवले होते. त्यानंतर मी त्या साक्षीदारांचे पुन्हा जबाब नोंदवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझेकडे तपास आला तेव्हा गुन्ह्यात हत्यार जप्त केलेले नव्हते. आरोपीने त्याच्या हातातील साखळीने मारहाण केल्याचे व ती घटनास्थळावरच पडल्याचे सांगितले होते परंतु घटनास्थळावर ती मिळुन न आल्याने ती साखळी जप्त केलेली नाही. आरोपीने ती साखळी कोणत्या दुकानातुन विकत घेतली याबाबत मी तपास केला नाही. जखमी वाजीद व मरजान यांना साखळीने जखमा होऊ शकतात का, याबाबत मी वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जाऊन विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या व्यक्तीला पोलीसांद्वारे दवाखान्यात पाठवल्यास त्याला मेमो दिला जातो. हे म्हणणे खरे आहे की, त्या मेमो वर वैद्यकीय अधिकाऱ्यांची तो रूग्ण किती वाजता आला याबाबत पोच घेऊन पोलीस ठाण्यात ती पोच जमा करून ठेवली जाते. हे म्हणणे खरे आहे की, तो मेमो मला चौकशी कामी प्राप्त झाला नाही. साक्षीदार मरजान याची जबानी दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्याने नोंद करून घेतल्याचे घडले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्याने मरजान याच्या तक्रारीवरून अदखलपात्र गुन्हा नोंद केला होता. मी त्या अदखलपात्र गुन्ह्याच्या नोंदीची प्रत प्राप्त केली नाही. साक्षीदार शकील याचा जबाब मी नोंदवला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याने अंदाजे एक महिन्यानंतर जबाब दिलेला आहे. मी त्याला जबाब देण्यासाठी बोलावले होते. शकील दिनांक २५.०६.२०२३ ते २३.०७.२०२३ जबाब देण्यास का आला नाही, याचे कारण मला निष्पन्न झाले नाही. फिर्याद दाखल केली त्यादिवशी किती साक्षीदारांनी जबाब दिला याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दाखल केली त्यादिवशी कोणत्याही साक्षीदाराने जबाब दिलेला नव्हता. आरोपीकडे घटनेच्यादिवशी फॉरच्युनर गाडी असल्याचे माझी तपासात निष्पन्न

झाले होते. मी त्या गाडीचा क्रमांक व कागदपत्र हस्तगत केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी दोनही जखमी मोटरसायकलने पडून जखमी झाले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व फिर्यादी यांच्यात जागेवरून वाद असल्याने फिर्यादीने खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे खोटे जबाब नोंद केले. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ उरण पोलीस ठाण्यापासून अंदाजे ४-५ किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेची फिर्याद त्यादिवशी संध्याकाळी ०७.३० च्या सुमारास दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा या गुन्ह्याशी काही संबंध नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत**

**सही/-**

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – १०/०६/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण**